**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विष्णू काका पवार
सी/४, पी अॅण्ड टी कॉलनी, टिळकनगर, चेंबूर(पश्चिम), मुंबई- अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, सांगली, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
विटा, विटा विभाग, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विष्णू काका पवार
सी/४, पी अॅण्ड टी कॉलनी, टिळकनगर, चेंबूर(पश्चिम), मुंबई-

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, सांगली, जि.सांगली
प्रतिनिधी श्री.बाळासाहेब वाघमोडे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
विटा, विटा विभाग, जि.सांगली श्री. अमोल नांबे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.९.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांपैकी कोणीही हजर नसल्याने दि.२९.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

समाईक मालकीच्या जागेतील झाडे अन्य वारसांच्या पूर्वसंमतीशिवाय तोडल्याच्या संदर्भात सन १९९९ पासून आपण तक्रार करूनही विटा, ता.खानापूर, जि.सांगली येथील पोलीस ठाण्यातील पोलिसांनी योग्य वेळी कारवाई केली नाही व त्या संदर्भात आपण मागितलेली माहितीही जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, विटा, विटा विभाग, जि.सांगली यांनी दिली नाही. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, जिल्हा सांगली यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही. वृक्षतोड कायद्यामध्ये असलेल्या तरतुदींचा भंग होऊनही आपली तक्रार दिवाणी स्वरूपाची असल्याचे कारण पुढे करून कारवाई लांबवली जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विष्णू काका पवार यांनी केली.

सन १९९९ मधील नोटिशीच्या प्रतींची मागणी श्री.पवार यांनी केली आहे. परंतु जतनाच्या वर्गवारीनुसार त्या कागदपत्रांची मुदत दोन वर्षांची आहे. त्यामुळे ते नाश करण्यात आले आहेत. समाईक मालमत्तेच्या मालकी हक्कासंबंधी वाद असून झाडे कोणाच्या मालकीची हा त्यातील मुख्य प्रश्न आहे व तो दिवाणी स्वरूपाचा आहे. त्यामुळे याबाबत कारवाईचे अधिकार पोलिसांकडे नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, विटा, विटा विभाग, जि.सांगली श्री.अमोल तांबे यांनी केले. श्री.पवार यांना सर्व माहिती देण्यात आली असून

दिवाणी स्वरूपाची बाब असल्याने पोलिसांनी कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही, असे वारंवार स्पष्ट केले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, जिल्हा सांगली श्री.बाळासाहेब वाघमोडे यांनी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, विटा, विटा विभाग, जि.सांगली अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, जिल्हा सांगली यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१८.३.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय विजय भिडे
१११९/१, उत्तर शिवाजीनगर,
कै.विष्णु विनायक भिडे मार्ग,
गणपती गॅस गोडावून जवळ,
सांगली ४१६ ४१६ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
जि.सांगली **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहा.आयुक्त (सांगली),
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८५/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०४.०४.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त,<br>सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,<br>जि.सांगली श्री.श्रीरंग भगवान पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** सहा.आयुक्त (सांगली),<br>सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,<br>जि.सांगली श्री.के.जे.लोंढे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.०७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.०७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०४.०९.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.०९.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सांगली), सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी माहिती दिली असली तरी ती राजपत्रित अधिकाऱ्यांच्या सहीने मिळणे आवश्यक आहे, असे अपीलकर्ता श्री.संजय विजय भिडे यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. अशा प्रकारची मागणी योग्य नसल्याचा निर्णय तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका श्री.श्रीरंग भगवान पाटील यांनी दिला असून माहिती मुदतीत दिली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सांगली),सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, श्री.के.जे.लोंढे यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका श्री.श्रीरंग भगवान पाटील यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सत्वशील धर्यशील शेळके
मु.पो.लोणंद, ता.खंडाळा,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
खंडाळा ता.खंडाळा,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
खंडाळा, ता.खंडळा,
जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८६+/सातारा/४८७/सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३/०८/२००८ |
| ३ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाच्या (जोडपत्र-अ) छायाप्रती सोबत जोडलेल्या आहेत. | |

**विवेचन**

दि.५/२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत' सदर दोन्ही अपिलांचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री. सत्वशील धर्यशील शेळके यांच्या दोन्ही माहिती -मागणी अर्जानुसार त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खंडाळा, श्री.व्ही.एस.क्षीरसागर व अपिलीय प्राधिकारी तहसीलदार खंडाळा, श्री जी.एस.सांगडे यांनी प्रपत्रात नमूद केलेले आहे. तसेच दि.३/१/२००९ रोजीच्या निवेदनान्वये आयोगास कळविले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती सुवर्णा अर्जुन भोसले
मु.पो.लांडेगाव, ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्यादित,विभाग इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित,, विभाग इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८७+७९५+५४३+३६० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.४.२००९(अ.क्र.४८७), दि.३०.८.२००८ (अ.क्र.३६०) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती सुवर्णा अर्जुन भोसले
मु.पो.लांडेगाव, ता.वाळवा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, विभाग इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली
विद्यमान-श्री.पी.जे.जेधे, तत्कालीन-श्री.आर.डी.चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभाग इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली प्रतिनिधी श्री.बी.एस.घनवट

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.११.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.११.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपील क्र.४८७ या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.४.४.२००९ रोजी घेण्यात आली.

ड्यूटी ऑपरेटर श्री.छगन देसाई यांची बदली, दैनिक भत्ता देयके, देयके प्रलंबित ठेवणारे कर्मचारी (प्रतिनिधी) यांच्यावर केलेली कारवाई इ.बाबतची माहिती आपण मागितली होती. परंतु ती अर्धवट व चुकीची दिली. एकाच विषयाबाबत आपली तीन अपिले असून त्यातील एका अपिलाचा निर्णय झाला. प्रत्यक्षात २९ रूपये शुल्क असताना ५०० रूपये शुल्क भरून घेतले व ऊर्वरित ४७३ रूपये परत करण्याऐवजी खर्चाचा तपशील न देता ३०७ रूपयांचा धनादेश दिला. अशा प्रकारे आपल्याला त्रास दिल्याबद्दल व माहिती पूर्ण न दिल्याबद्दल संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्त्या श्रीमती सुवर्णा अर्जुन भोसले यांनी केली.

श्री.देसाई यांच्या संदर्भातील तीच तीच माहिती श्रीमती भोसले सातत्याने विविध अर्ज व अपिलांद्वारे पुन:पुन्हा मागत आल्या आहेत. वेळोवेळी ही माहिती त्यांना देण्यात आली आहे. आणखी कोणतीही माहिती हवी असल्यास ती देण्याची तयारी आहे. मात्र त्यांच्या अर्जातील व निवेदनांमधील मुद्दे माहिती-मागणीचे नसून स्पष्टीकरण वा भाष्य मागणारे, तसेच प्रशासकीय कार्यवाहीबाबत आक्षेप घेऊन त्यानुसार 'कार्यवाही करून माहिती द्यावी' अशा स्वरूपाचे आहेत. 'सेवा विनियमनातील तरतुदीनुसार नुकसानीस जबाबदार असणारे कर्मचारी / प्रतिनिधी यांच्या मासिक वेतनामधून नुकसानभरपाई वसूल केलेल्या दंडात्मक कारवाईची माहिती मागणी

केल्याप्रमाणे द्यावी. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही, असे कळवून मागणीप्रमाणे माहिती दिलेली नाही,' असे मुद्दे अपीलकर्त्यांनी मांडले आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली यांचे प्रतिनिधी श्री.बी.एस.घनवट व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली श्री.आर.डी.चव्हाण यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

अपीलकर्त्यांनी विविध अर्जांमध्ये व विविध निवेदनांमध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेल्या प्रशासकीय कार्यवाहीबाबत अनेक आक्षेप नोंदविले असून त्यानुसार पूर्तता करावी व माहिती द्यावी अशा स्वरूपाची मागणी केली आहे. तसेच स्पष्टीकरण अथवा भाष्य मागणारे मुद्दे उपस्थित केले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील माहितीच्या व्याख्येत या बाबी समाविष्ट होत नाहीत. जन माहिती अधिकाऱ्यांनी वेळोवेळी माहिती दिली आहे. मात्र शुल्काबाबतच्या अपीलकर्त्याच्या तक्रारींची दखल घेऊन शुल्काचा नेमका तपशील द्यावा व ऊर्वरित रक्कम त्वरित परत करावी असे मौखिक आदेश आयोगाने दिले. त्यानुसार खर्चाचा तपशील व त्यानुसार होणारे १९३ रूपये शुल्क वजा जाता ऊर्वरित रूपये ३०७ चा धनादेश दि.३०.५.२००९ रोजी अपीलकर्त्यास देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली यांच्या तर्फे श्री.प्र.व.मोहिते यांनी आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली यानी आयोगाच्या आदेशानुसार याबाबतची कार्यवाही त्वरित न केल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

अपीलक क्र.३६० मध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे.

अपीलकर्त्यांची अपील क्र.७९५ व ५४३ ही अपिले याच विषयाबाबत त्याच त्याच स्वरूपाचे भाष्य, निवेदन व मागणी करणारी आहेत, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी वेळोवेळी माहिती दिली आहे, असे उभय बाजूंनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.राजेंद्र काशीनाथ वेल्हाळ
५६७, गणेश पेठ, मेणकर वाडा,पुणे-२ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** व्यवस्थापक,
पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित,
शंकरशेठ रोड, पी.एम.टी.बिल्डिंग,
स्वारगेट, पुणे-३७ **उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९४/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.१.२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.१.२०१०, दि.१५.१.२०१० |
| ४ | मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती :- पी.एम.पी.एम.एल.मधील कर्मचारी श्री.सुनिल गवळी यांच्या संदर्भात वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.राजेंद्र काशीनाथ वेल्हाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**स्थळ : पुणे**
**दिनांक :** 18 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वैभव तुकाराम पाटील
मु.पो.उंडाळे, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. पहिला मजला,
वाशानी चेंबर्स, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई-२०

**जन माहिती अधिकारी तथा** वित्त सल्लागार व मुख्य लेखाधिकारी,
महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. पहिला मजला,
वाशानी चेंबर्स, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई-२० — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९४ / सातारा /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.३.२००९ |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.८.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांपैकी कोणीही हजर न राहिल्याने दि.१८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. परंतु सुनावणीलाही उभय घटकांपैकी कोणीही हजर राहिले नाहीत.

जन माहिती अधिकारी तथा वित्त सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या., पहिला मजला, वाशानी चेंबर्स, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई-२० यांनी दिलेली महाराष्ट्र राज्यातील यंत्रमाग महामंडळाकडील नियुक्तीच्या संदर्भातील माहिती पूर्णतः चुकीची वाटते. नियमानुसार योग्य ती मान्यता न घेता महामंडळातील अधिकाऱ्यांच्या व्यपगत झालेल्या पदांचे पुनरूज्जीवन, पदभरती व नियुक्ती मंडळाच्या कार्यकारी संचालकांनी केलेली आहे. जन माहिती अधिकारी तथा वित्त सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या., पहिला मजला, वाशानी चेंबर्स, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई-२० व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. पहिला मजला, वाशानी चेंबर्स, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई-२० यांनी दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असून महामंडळाच्या कारभाराची सर्वंकष चौकशी व्हावी अशी मागणी अपीलकर्ता श्री.वैभव तुकाराम पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व निवेदनात केली आहे.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'ची व सुनावणीची सूचना देणारे पत्र संबंधित तारखेनंतर मिळाल्यामुळे उपस्थित राहता आले नसल्याचा लेखी खुलासा जन माहिती अधिकारी तथा वित्त सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या., पहिला मजला, वाशानी चेंबर्स, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई-२० श्री.नरेंद्र जैन व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या., पहिला मजला, वाशानी चेंबर्स, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई-२० श्री.जयंत मगरे यांनी केला.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.पाटील यांचा माहिती-मागणीचा अर्ज दि.११.६.२००८ चा असून जन माहिती अधिकारी तथा वित्त सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या., पहिला मजला, वाशानी चेंबर्स, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई-२० श्री.नरेंद्र जैन यांनी दि.५.७.२००८ रोजी उत्तर दिले. त्याबाबत श्री.पाटील यांनी माहिती चुकीची वाटते, असे नमूद केले असून प्रामुख्याने नियमबाह्य कारवाई महामंडळाने केल्याचे आक्षेप नोंदविले आहेत. तसेच महामंडळाच्या कारभाराच्या चौकाशीचीही मागणी केली आहे. या बाबी प्रशासकीय कार्यवाहीच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१७.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दिलीप गोविंद गुरव
व्दारा टिळक आयुर्वेद महाविद्यालय,
रास्ता पेठ, पुणे-४११०११

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,**
सी.टी.बोरा महाविद्यालय,
शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
सी.टी.बोरा महाविद्यालय,
शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९६/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७/१०/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१/१२/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १/१२/२००९ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सी.टी.बोरा महाविद्यालय, शिरुर मधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका, सेवाजेष्ठता, पदोनती, वेतन व रिक्त पदे इ. तपशील तसेच महाविद्यालयात चालविले जाणारे अभ्यासक्रम इ. बाबत एकूण १३ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दिलीप गोविंद गुरव यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत आवश्यक शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. किसन नाथा आगवणे
मु.पो.निंभोरे,
ता.फलटण, जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती फलटण, ता.फलटण,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत निंभोरे, ता.फलटण,
जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९६/सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८/०८/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१९/०९/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.किसन नाथा आगवणे यांनी ग्रामपंचायत निंभोरे हद्दी मध्ये घर बांधण्यास परवानगी मिळण्यासाठी केलेल्या अर्जाची व देण्यात आलेल्या परवानगी पत्राची छायाप्रत तसेच सदर घराचे स्वच्छता गृह पाडून टाकण्याच्या केलेल्या कारवाईबाबतची माहिती | |

## विवेचन

दि.५/२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत' सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री. किसन नाथा आगवणे यांना त्यांच्या माहिती - मागणी अर्जानुसार माहिती दिलेली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत निंभोरे, ता.फलटण, श्री.एम.यू.तारळकर व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती फलटण, ता.फलटण, श्री. विजय सिंह जाधव यांनी प्रपत्रामध्ये नमूद केले आहे. तसेच अन्य व्यक्तींनी बांधलेल्या घरांची आठ (ड) ला नोंद घेवून त्यांच्यावर कारवाई का करण्यात आली नाही; त्यांना ग्रामपंचायतीच्या मालमत्ता करात का सवलत देण्यात आली ? या बाबतचे खुलासे देण्याची अपीलकर्ता श्री.आगवणे यांनी केलेली मागणी ही 'माहिती' ठरत नाही. प्रपत्रात उभय बाजूंनी नमूद केलेल्या बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत शिवाजी चांभार(गवळी)
अर्बन बँकेसमोर, चंद्रकांत लेदर वर्क्स, कुरूंदवाड,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
राधानगरी विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०० / कोल्हापूर / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, राधानगरी विभाग, कोल्हापूर श्री.विवेक आगवणे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.८.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.९.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता यांनी मागितलेली गायरान मंजुरीच्या आदेशाबाबतची प्रत सन १९६६ मधील असून अभिलेखात मूळ आदेश आढळ होत नाही, असे कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यानी दिलेल्या आदेशानुसार तहसीलदार, राधानगरी, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर यांना सूचना देऊन तेथेही शोध घेतला. परंतु हा आदेश कायमस्वरूपी जतनाचा असूनही अतिरिक्त भूखंड वाटपाची ही वेगळी संचिका उपलब्ध होत नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, राधानगरी उपविभाग, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर श्री.विवेक आगवणे यांनी केले. संबंधित अभिलेखाचा शोध घेण्याबाबत केलेल्या प्रयत्नांच्या पुराव्यादाखल संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

चौकशी रजिस्टरमधील नोंदीमध्ये गायरानातील भूखंड वाटपाचा उल्लेख असून मूळ आदेशाची प्रत उपलब्ध न झाल्यास क्षेत्रातील तफावतीबाबत दाद मागता येणार नाही, असे श्री.चांभार(गवळी) यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे. अभिलेखात या कागदपत्रांचा कसून शोध घेण्यात यावा, तसेच श्री.शिवा तुकाराम चांभार यांना भूखंड मंजूर केलेल्या आदेशाबाबतची प्रत त्यांच्याकडून प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास देता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) चौकशी रजिस्टरमधील नोंदीमध्ये गायरानातील भूखंड वाटपाचा उल्लेख असून मूळ आदेशाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करून देण्यासाठी कसून शोध घेण्यात यावा व त्याचा अहवाल दि.२७.३.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि.१५.३.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) चौकशी रजिस्टरमधील नोंदीमध्ये गायरानातील भूखंड वाटपाचा उल्लेख असून मूळ आदेशाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करून देण्यासाठी कसून शोध घेण्यात यावा व त्याचा अहवाल दि.२७.३.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१५.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शाम आबा अहिवळे
११५-अ, मंगळवार पेठ,
फलटण, जि.सातारा ४१५ ५२३ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप विभागीय कृषि अधिकारी,
कृषि विभाग फलटण, ता.फलटण, जि.सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय कृषि अधिकारी,
कृषि विभाग फलटण, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०३/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** उप विभागीय कृषि अधिकारी, कृषि विभाग फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.आर.एच.सरतापे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय कृषि अधिकारी, कृषि विभाग फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.राजेंद्र बा.माने | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.५.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.८.५.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती केवळ ४ पानांची असूनही विलंबाने दिली. त्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, कृषि विभाग फलटण, जि.सातारा श्री.राजेंद्र बाळासाहेब माने यांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शाम आबा अहिवळे यांनी केली.

श्री.अहिवळे यांचा अर्ज दि.०८.०४.२००९ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर संबंधित माहिती सादर करण्याबाबत (१) श्री.व्ही.व्ही.कुलकर्णी,दहिवडी (२) श्री.बी.जी.कदम,मलवडी (३) श्री.एस.पी.वाघ, वर-मलवडी (४) श्री.आर.एल.घोळवे,मार्डी (५) श्री.व्ही.सी.गमरे,म्हसवड यांना दि.१५.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. त्यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे दि.२४.०४.२००९ रोजी 'ज्ञापन' व दि.३.५.२००९ रोजी 'कारणे दाखवा नोटीस' बजावण्यात आली. दि.१५.०६.२००९ रोजी त्यांच्याकडून माहिती प्राप्त होताच त्याच दिवशी श्री.अहिवळे यांना पाठविली. याच काळात कृषी दिंडीचा कार्यक्रम असल्यामुळे सर्व अधिकारी / कर्मचारी त्यात गुंतलेले होते. तसेच कार्यालयात अपुरा कर्मचारी वर्ग आहे. त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, कृषि विभाग फलटण, जि.सातारा श्री.राजेंद्र बाळासाहेब माने यांनी केले. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यार्थ त्यांनी कागदपत्रे सादर केली.

आठ दिवसांत माहिती नि:शुल्क देण्याचे आदेश दि.१०.०६.२००९ रोजी आपण दिले होते. परंतु मंडल कृषि अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही. कृषि दिंडीच्या कामामुळे उशीर झाल्याचे त्यांनी सांगितले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, कृषि विभाग फलटण, जि.सातारा श्री.आर.एच.सरतापे यांनी केले.

अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती अत्यंत मर्यादित स्वरुपाची आहे. विहित मुदतीत ती देणे शक्य होते. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, कृषि विभाग फलटण, जि.सातारा श्री.राजेंद्र बाळासाहेब माने यांनी ही माहिती देण्याबाबत अधिनस्त मंडल कृषि अधिकाऱ्यांना वेळोवेळी जाणीव देऊनही त्यांनी विलंब केला आहे. मागितलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता कृषि दिंडीचा कार्यक्रम, अपुरा कर्मचारी वर्ग ही कारणे समर्थनीय नाहीत. त्यामुळे माहिती देण्यास जबाबदार असलेले व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये जन

माहिती अधिकारी ठरणारे मंडल कृषी अधिकारी (१) श्री.व्ही.व्ही.कुलकर्णी,दहिवडी (२) श्री.बी.जी.कदम,मलवडी (३) श्री.एस.पी.वाघ,वर-मलवडी (४) श्री.आर.एल.घोळवे,मार्डी (५) श्री.व्ही.सी.गमरे,म्हसवड हे शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, दहिवडी,ता.माण, जि.सातारा श्री.राजेंद्र बाळासाहेब माने यांनी कळविल्यापासून माहिती देण्यास लागलेला कालावधी लक्षात घेता दि.१५.०५.२००९ ते दि.१५.०६.२००९ हा विलंबाचा कालावधी धरुन ३२ दिवसांसाठी (१) श्री.व्ही.व्ही.कुलकर्णी, दहिवडी (२) श्री.बी.जी.कदम,मलवडी (३) श्री.एस.पी.वाघ, वर-मलवडी (४) श्री.आर.एल.घोळवे,मार्डी (५) श्री.व्ही.सी.गमरे, म्हसवड यांना प्रत्येकी प्रतिदिन रु.२५०/- प्रमाणे प्रत्येकी रु.८,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्तीची रक्कम मार्च, एप्रिल व मे २०१० मध्ये देय असणाऱ्या फेब्रुवारी, मार्च व एप्रिल २०१० च्या वेतनातून तीन समान हप्त्यांत वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६० इतर सेवा,८००, इतर जमा रकमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशीर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, कृषि विभाग, फलटण, जि.सातारा यांनी करुन याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**स्थळ : पुणे**
**दि.** 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अशोक मुत्ताप्पा देवाडिगा
बंदी क्र.सी-२७९५, सर्कल क्र.७/४,
कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह,
कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा,**
कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल, मलकापूर,
ता.कराड, जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा,**
कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल, मलकापूर,
ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०३/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०८/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९/०८/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/१०/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** कृष्णा हॉस्पिटल, कराड येथे दि.३१/३/२००१ रोजी रात्री ८.०० ते ९.०० या कालावधीत व दि.१/४/२००१ रोजी सकाळी ६.०० ते सायंकाळी ८.०० वाजेपर्यंत दाखल करण्यात आलेल्या पेशंटच्या रजिस्टर मधील मूळ नोंदीची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०/१२/२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री. अशोक मुत्ताप्पा देवाडिगा यांनी कृष्णा हॉस्पिटल, कराड येथे दि.३१/३/२००१ रोजी रात्री ८.०० ते १.०० या कालावधीत व दि.१/४/२००१ रोजी सकाळी ६.०० ते सायंकाळी ८.०० वाजेपर्यंत दाखल करण्यात आलेल्या पेशंटच्या रजिस्टरमधील मूळ नोंदींची माहिती (पेशंटची नावे, पत्ता, वेळ, व ओपीडी नं.इ. बाबत) मिळणेबाबत अर्ज केला आहे. याबाबत सदरची माहिती न्यायालयामार्फत रितसर मागवून घेण्यात यावी, असे जन माहिती अधिकारी, कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल, मलकापूर यांनी अपीलकर्त्यास कळविले. या संदर्भात जिल्हा न्यायालय, कराड यांनी त्यांचे पत्र जा.क्र.१३४३/२००८ दि.५/९/२००८ अन्वये माहिती नाकारलेल्या आदेशाविरुध्द अपील करण्याची तरतूद असल्याने अपीलकर्त्याचा अर्ज निकाली काढला आहे. वरील बाबी, तसेच उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व अन्य रुग्णांची माहिती इतर व्यक्तींना देता येणार नाही, हे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.योगेश आनंदा फोंडे
प्लॉट नं.८२, छत्रपती शिवाजी नगर,
मु.पो.शिरोली (पु.), ता.हातकणंगले,
जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरु,**
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा परिक्षानियंत्रक,**
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०५/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९/०९/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१/११/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षातील वृतपत्रविद्या व संवाद-शास्त्र विभागातील अपीलकर्त्याच्या बैठक क्रमांक ०५चा गुणतक्ता व गुणपत्रकाची छायाप्रत | |

## विवेचन

दि.३०/१२/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत' सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री. योगेश आनंदा फोंडे यांना गुणतक्त्यांची छायाप्रत, अंतर्गत कार्यालयीन टिपणी ( निकाल राखून ठेवणे बाबतची इ.) कागदपत्रे विहित वेळेत दिली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा परिक्षानियंत्रक श्री.भगवान महादेव हिर्डेकर यांनी प्रपत्रात नमूद केलेले आहे. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सत्वशील धैर्यशील शेळके
रा.लोणंद, ता.खंडाळा,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०६/सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९/०७/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २/०९/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६/०९/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** राज्य माहिती आयोगाने अपील क्र.७२/सातारा प्रकरणी आदेशीत केल्याप्रमाणे आयोगास सादर केलेल्या अहवालाची सत्यप्रत | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. सत्वशील धर्यशील शेळके यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रे विचारात घेता अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा यांनी दिलेला निर्णय योग्य असल्याने सदरचा निर्णय कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत मारूती पालकर
८९/९१, जुनी हनुमान लेन, काळबादेवी, मुंबई-२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आजरा,
ता.आजरा, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत मारूती पालकर
८९/९१, जुनी हनुमान लेन, काळबादेवी, मुंबई-२

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.विष्णू केरबा नाईक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.८.२००६ व २.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.९.२००६ व ३०.६.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.८.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

खोटी कागदपत्रे व प्रतिज्ञापत्रे सादर करून खेडे, ता.आजरा, जि.कोल्हापूर येथील गावठाणातील राखीव जागेत शाळा बांधण्याच्या नावाखाली प्रकरण पाठविले. नायब तहसीलदार, आजरा व तहसीलदार आजरा यांनी ते मंजूर करून जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे पाठविले. त्याबाबतची माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात आहे. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर यांनी अपील मंजूर केले, परंतु पुढील कार्यवाहीचा आदेश दिला नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर याच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.वसंत मारूती पालकर यांनी केली.

श्री.पालकर यांनी केलेली माहितीची मागणी सुस्पष्ट नाही. त्यांनी स्पष्ट मागणी नमूद करून माहिती मागितल्यास देता येईल, असे त्यांना कळविले होते. त्यांनी तसे कळविले नाही त्यामुळे माहिती देता आली नाही. शाळा प्रकरणातील माहिती त्यांना हवी असल्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'नंतर स्पष्ट झाले. त्यानुसार माहिती आणलेली आहे, कोणतीही माहिती लपविण्याचा

उद्देश नाही, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.विष्णू केरबा नाईक यांनी नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर यांनी विहित मुदतीत अपीलकर्त्यास उत्तर दिले आहे. अपीलकर्त्याच्या मूळ अर्जात माहिती-मागणीबाबत काही प्रमाणात संदिग्धता आहे. त्यांनी नेमका तपशील देणे आवश्यक होते, हे म्हणणे रास्त आहे. तथापि त्यांनी उल्लेख केलेल्या पत्राच्या तारखेवरून अधिक शोध घेऊन हव्या असलेल्या माहितीबाबतची निश्चिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर यांना करता आली असती, ती त्यांनी केलेली नाही. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर यांनी अपील मंजूर करण्यात आल्याचा एका ओळीचा आदेश दिला आहे, तथापि माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर यांना नेमकेपणाने निर्देश त्यात दिलेले नाहीत. तसेच माहिती देण्याबाबत झालेल्या कार्यवाहीची पूर्तता होण्याची काळजीही त्यांनी घेतलेली नाही. हे लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्रीमती एस.डी.तावदारे व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.नितीन राऊत यांनी १५ दिवसात खुलासा आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.विषणू केरबा नाईक यांनी त्यांना याबाबत कळविणे आवश्यक होते. तथापि अशा प्रकारचा अहवाल आयोगाला प्राप्त झालेला नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्रीमती एस.डी.तावदारे व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.नितीन राऊत यांनी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा व विलंबाबाबतचा खुलासा दि.२५.३.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.व्ही.के.नाईक यांनी संबंधितांना आयोगाचे आदेश कळविण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अनुषंगिक कागदपत्रांसह खुलासा दि.२५.३.२०१० पर्यंत सादर करावा.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जितेंद्र शिवाजीराव शिंदे
मु.पो.कुडाळ, ता.जावळी, जि.सातारा — मूळ अर्जदार

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर),
महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक, प्रतापगड सहकारी
साखर कारखाना लि., मु.पो.सोनगावा करनदोशी, ता.जावळी,जि.सातारा — अपीलकर्ता

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२१ / सातारा /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**मूळ अर्जदार** श्री.जितेंद्र शिवाजीराव शिंदे
मु.पो.कुडाळ, ता.जावळी, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर),
महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ प्रतिनिधी श्री.सचिन रावल

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक, प्रतापगड सहकारी
साखर कारखाना लि., मु.पो.सोनगावा करनदोशी, ता.जावळी,जि.सातारा
प्रतिनिधी ॲड.डी.पी.खुर्जेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.१०.२००८ |
| ८ | माहिती मागणीच्या अर्जाची (मूळ अर्ज) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

प्रतापगड सहकारी साखर कारखान्याच्या वीस संचालकांच्या ऊस पुरवठ्या संदर्भातील माहिती मूळ अर्जदार श्री.जितेंद्र शिवाजीराव शिंदे यांनी मागितली होती. गोदावरी साखर कारखाना हा खाजगी साखर कारखाना असून शासनाच्या मान्यतेने नोव्हेंबर २००५ मध्ये झालेल्या भाडेपट्टा करारनुसार प्रतापगड सहकारी साखर कारखाना त्यांना चालविण्यास देण्यात आला आहे. त्यामुळे माहिती प्रतापगड सहकारी साखर कारखान्याकडे नसून गोदावरी कारखान्याकडे आहे. असे असूनही महाराष्ट्र सहकारी कायद्याच्या कलम ३२ पमाणे श्री.शिंदे यांना माहितीच्या प्रती देण्याची तयारी दर्शविली असताना ते आले नाहीत. गोदावरी कारखान्याकडून मिळालेली माहिती देण्यात आली आहे. तरीही अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी माहिती देण्याचा आदेश संबंधित भाडेपट्टा कराराचा विचार न करता दिला. तो नियमबाह्य असल्यामुळे रद्द व्हावा, अशी मागणी अपीलकर्ता कार्यकारी संचालक, प्रतापगड सहकारी साखर कारखाना लि., मु.पो.सोनगावा करनदोशी, ता.जावळी, जि.सातारा यांचे प्रतिनिधी ॲड.डी.पी.खुर्जेकर यांनी केली.

कारखान्याने निवडणुक अधिकाऱ्यांना सादर केलेली माहितीच आपण मागितली होती. उपविभागीय अधिकाऱ्यांकडून आपल्याला जी माहिती मिळाली. ती कारखाना का देऊ शकत नाही, असा मुद्दा मूळ अर्जदार श्री.जितेंद्र शिवाजीराव शिंदे यांनी मांडला.

प्रतापगड सहकारी साखर कारखान्याला शासकीय अनुदान व सवलती मिळतात. त्यामुळे या कारखान्याला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू असल्याचे सहकार आयुक्तांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे. त्यामुळे कारखान्याने माहिती देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.सचिन रावल यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता गोदावरी साखर कारखाना या खाजगी साखर कारखान्याशी झालेल्या भाडेपट्टा करारानुसार गोदावरी कारखान्याकडे असलेली माहिती प्रतापगड सहकारी साखर कारखान्याकडून देता येणार नाही. तसेच निवडणुकीच्या संदर्भातील उपलब्ध झालेली माहिती दिली, हे अपीलकर्ता श्री.जितेंद्र शिवाजीराव शिंदे यांचे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे. अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी माहिती देण्याबाबत दिलेला आदेश त्यामुळे रद्दबातल ठरतो.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील मान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१८.३.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**